# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग

स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पूर्व)
ता.जि. ठाणे - 401 107. दूरध्वनी : 022-28121455, • E-mail Id : tp@mbmc.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र :- मनपा/नर/ 2069/2024-2026 दिनांक :- 24/09/2024

प्रति,
विभाग प्रमुख
जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय - जाहिर सुचना प्रसिद्धी करणेबाबत.
संदर्भ :- प्रशासकीय ठराव क्र.237 दि.23/09/2025

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा या सहा गावांची प्रारुप सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 चे कलम 26(1) अन्वये प्रसिद्ध करणेच्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या संदर्भिय प्रशासकीय ठरावान्वये मंजूरी दिलेली असून याबाबत जनतेच्या हरकती व सूचनासाठी सूचना प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

यास्तव सदरची मराठी व इंग्रजी भाषेतील सुचना मिरा भाईंदर **महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर** व जास्ती खपाच्या किमान **दोन मराठी तसेच इंग्रजी वृत्तपत्रांत** प्रसिध्द करण्यात यावी व सदरच्या कार्यवाहीनंतर सुचना प्रसिद्धीकरण करण्यात आलेल्या वृत्तपत्राच्या छायाप्रती (दोन प्रतीत) या कार्यालयास उलट टपाली पाठवुन देण्यात याव्यात.

(पु.म. शिंदे)
**सहायक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

सोबत :- जाहीर सुचनेची प्रत.

प्रत - माहितीस्तव
स्विय सहाय्यक, मा. आयुक्त सो., दालन, मिरा भाईंदर महानगरपालिका

मु.वि.बो.(Legal) 2025 जनसंपर्क अधिकारी

# MIRA BHAYANDAR MUNICIPAL CORPORATION

## TOWN PLANNING DEPARTMENT

Swami Vivekanand Bhawan, Near RBK School, Kanakia, Mira Road (East),TQ.&DIST. Thane-401107

# NOTICE

**Publication of Revised Draft Development Plan of Villages-Uttan, pali, Chowk, Tarodi, Dogri & Morva included in Mira Bhayandar Municipal Corporation,**
Under Section 26 (1) of
**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

**NO.MNP/NR/**2060/25-26 **Date –** 24/09/25

Whereas, the Government of Maharashtra has appointed the Mumbai Metropolitan Region Development Authority (hereinafter referred to as its acronym "MMRDA") established under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974(Mah. IV of 1975) to be the Special Planning Authority by the state Government in Urban Development Department's Notification No.TPB 4307/108/CR- 29/07/UD-11 Dated 1 December 2007 promulgated in exercise of its powers conferred by sub-section (1) of Section 40 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966(hereinafter referred to as "the said Act") for the area of villages Manori & Gorai (Municipal Corporation of Greater Mumbai) and Uttan, Pali, Chowk, Tarodi, Dongari, Morva (Mira Bhaynader Municipal Corporation) notified in the schedule of the said Notification (hereinafter referred to as Notified Area"), to be developed as Recreation and Tourism Development Zone as per proposal of Sanctioned Regional Plan;

And whereas, the MMRDA as a Special Planning Authority has completed its obligatory duty to prepare a plan for the Notified area and, submitted the same to the State Government for sanction under section 30 of the said Act;

And whereas, in exercise of its powers under sub-section (1) of Section 31 of the said Act, the Government of Maharashtra in Urban Development Department by its Notification No. TPB-4312/323/CR-23/2013/UD-11, dated the 13/05/2013 and dated the 03/06/2016 has sanctioned the Development Plan of Notified Area (hereinafter referred to as "the said Sanctioned Development Plan") submitted by the MMRDA;

And whereas, as the Notified Area falls in the limit of Municipal Corporation of Greater Mumbai and Municipal Corporation of Mira Bhayandar, (hereinafter referred to as the "said planning authority") and the concerned Municipal Corporations are implementing their sanctioned Development Plan as a Planning Authority, therefore to continue the appointment of MMRDA as a Special Planning Authority for implementation of the said Plan is no more required, the concerned Municipal Corporations shall implement the said plan along with their sanctioned Development Plans. Therefore, the Government Cancelled the appointment of MMRDA as special Planning Authority vide notification no. TPB-4316/P.no.257/2016/UD-11 dated 16/03/2017 for the said notified area, and the said area merge it, in the area of respective jurisdiction of the said Conserned Plannning Authority.

And whereas, the Mira Bhayandar Municipal Corporation (hereinafter referred to as the "said planning authority") vide Resolution No.460, dated 13th March, 2024, had declared its intention to Revision of Draft Development Plan of of Villages-Uttan, pali, Chowk, Tarodi, Dogri & Morva included in Mira Bhayandar Municipal Corporation, (hereinafter referred to as the "said Draft Development Plan") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as the said "area" ) as per the provision of section 38 read with section 23(1) of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966. (hereinafter referred to as the "said Act") and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette extra-ordinary Part II on 13th March 2024.

And whereas, as per the provision in section 24 of the said Act, the Mira Bhayandar Municipal Corporation, vide Order No.MNP/TP/86/2024-25, dt. 25th April, 2024 has appointed Assistant Director of Town Planning, Mira Bhayandar Municipal Corporation as "Town Planning Officer" to prepare the said Draft Development Plan for the said area;

And whereas, as per the provisions of the said Act, the Town Planning Officer and Assistant Director, Town Planning, Mira Bhayandar Municipal Corporation, after preparing the existing land use map under section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the Mira Bhayandar Municipal Corporation for publication under section 26(1) of the said Act;

And whereas, the said Planning Authority has passed Resolution No.237, dated 23/09/2025 to publish the said Draft (Revised) Development Plan under section 26(1) of the said Act, for inviting suggestions/objections from the public.

Therefore, Mira Bhayandar Municipal Corporation, hereby publishes the said Draft (Revised) Development Plan along with the Report under section 26(1) of the said Act for inviting suggestions/objections from the public. The copy of the said Draft (Revised) Development Plan and Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours.

1. Municipal Commissioner, Mira Bhayandar Municipal Corporation, Bhayandar.
   Indira Gandhi Bhawan, Chhatrapati Shivaji Maharaj Road, Station Road, Bhayandar (West), Dist Thane-401101.
2. Assistant Director of Town Planning, Mira Bhayandar Municipal Corporation
   Swami Vivekanand Bhawan, Besides R.B.K. School, Kanakiya, Mira Road (East), Dist Thane-401101.

The copies of the said Draft (Revised) Development Plan and particulars shall be available to the public at reasonable price in the office of Town Planning Officer and Assistant Director of Town Planning, Mira Bhayandar Municipal Corporation.

The suggestions/objections if any, in writing from the public in this regard with reasons, shall be submitted to The Municipal Commissioner, Mira Bhayandar Municipal Corporation, Late Indira Gandhi Bhavan, Head Office, Second Floor, Chhatrapati Shivaji Maharaj Road, Station Road, Bhayandar (West), District Thane-401101, Mira Bhayandar, within the period of 30 days from the date of publication of the Notice in Maharashtra Goverment Gazette. Suggestions/objections received by the Mira Bhayandar Municipal Corporation, Bhayandar within the period of the 30 days from the date of publication of this Notice in Maharashtra Government Gazette shall only be considered.

Place :- Mira-Bhayandar
Date :- 24/09/2025

**(Radhabinod A. Sharma (I.A.S))**
**Administrator**
**And**
**Municipal Commissioner,**
**Mira Bhayandar Municipal Corporation**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## नगररचना विभाग

**स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. स्कूलच्या बाजूला, कनाकिया, मिरारोड (पूर्व), ता.जि.ठाणे - 401 107**

# सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 चे कलम 26(1) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामधील मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोर्वा या 06 गावांची विकास योजना प्रसिध्दीकरण करणेबाबत.**

**क्र.मनपा/नर/** 2080/2024-2026 **दि.** 28/08/2024

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, 1974 (1975 चा महा. 4 था) अन्वये स्थापन झालेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापुढे ज्यांच्या उल्लेख "एमएमआरडीए" असा केलेला आहे.) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, 1966 (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केलेला आहे) चे कलम 40 च्या पोटकलम 1 अन्वये शासन नगर विकास विभागाकडील अधिसूचना क.टिपीबी 4307/108/प्र.क्र.29/07/नवि-11, दिनांक 01/12/2007 अन्वये मौजे मनोरी, गोराई (बृहन्मुंबई महानगरपालिका हद्द) आणि उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा (मिरा भाईंदर महानगरपालिका हद्द) या गावांसाठी सदर अधिसूचनेमध्ये उल्लेखिलेल्या क्षेत्रासाठी (यापुढे याचा उल्लेख उक्त "अधिसुचित क्षेत्र" असा केलेला आहे), मंजूर प्रादेशिक योजनेच्या प्रस्तावानुसार मनोरंजन आणि पर्यटन विकास विभागाच्या विकासासाठी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, एमएमआरडीए ने उक्त अधिनिमाच्या तरतुदीनुसार विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने उक्त अधिसूचित क्षेत्राचा विकास आराखडा तयार करण्याचे कर्तव्य पार पाडून तसा आराखडा उक्त अधिनियमाचे कलम 30 अन्वये शासनास सादर केलेला होता;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम 31 च्या पोटकलम (1) अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारांचा वापर करुन राज्य शासनाकडे एमएमआरडीए ने सादर केलेल्या उक्त अधिसूचित क्षेत्राच्या विकास आराखडयास नगर विकास विभागाकडील क्रमांक सिएमएस/टिपीबी-4312/प्र.क्र.23/2013/नवि-11 दिनांक 13 मे 2013 व दिनांक 3 जून 2016 रोजीच्या अधिसूचनेन्वये मंजूरी दिलेली आहे. (यापुढे याचा उल्लेख उक्त "मंजुर विकास योजना" असा केला आहे)

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचित क्षेत्र हे बृहन्मुंबई महानगरपालिका व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये समाविष्ट असून संबंधित महानगरपालिका त्यांच्या मंजूर विकास योजनेप्रमाणे उक्त मंजुर विकास योजनेची अंमलबजावणी करु शकणार असल्याने एमएमआरडीए ची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती कायम ठेवणेचे प्रयोजन राहत नसल्याने शासनाने, क्र.टिपीबी-4316/प्र.क्र.257/2016/नवि-11 दि.16/03/2017 रोजीच्या अधिसुचनेव्दारे

मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण या विशेष नियोजन प्राधिकरणाची नियुक्ती रद्द करुन सदर क्षेत्रासाठी नियोजन प्राधिकरण म्हणुन संबंधित महानगरपालिकेची नियुक्ती केली आहे.

ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिकेने (यापुढे याचा उल्लेख "उक्त नियोजन प्राधिकरण" असा केला आहे), तिच्या अधिपत्याखालील **मौजे-उत्तन, पाली, चौक, तारोडी, डोंगरी व मोरवा** क्षेत्राची (यापुढे याचा उल्लेख "उक्त क्षेत्र" असा केला आहे), महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, 1966 (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा केला आहे), चे कलम 38 सह कलम-23(1) अन्वयेच्या तरतूदीनुसार प्रारुप सुधारीत विकास योजना, (यापुढे याचा उल्लेख "उक्त प्रारुप विकास योजना" असा केला आहे), तयार करण्याचा इरादा जाहिर करण्यासाठी सर्वसाधारण सभेचा (प्रशासकीय ठराव) क्र.460 दि.13 मार्च, 2024 अन्वये मान्यता दिली असून त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग-2 मध्ये दि.13 मार्च, 2024 रोजी प्रसिद्ध केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम 24 च्या तरतुदीस अनुसरुन मिरा भाईंदर महानगरपालिकेने उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी सहायक संचालक, नगररचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची "नगररचना अधिकारी" म्हणुन आदेश क्र. मिभा/मनपा/नर/86/2024-25, दि.25/04/2024 अन्वये नेमणुक केली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या तरतुदीनुसार, नगररचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी, उक्त अधिनियमाचे कलम 25 अन्वये विदयमान जमिन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन ती मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे उक्त अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये प्रसिध्द करणेसाठी हस्तांतरीत केली आहे;

आणि ज्याअर्थी, मिरा भाईंदर महानगरपालिकेने उक्त अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडून सुचना / हरकती मागविणेकरीता प्रसिध्द करण्यासाठी ठराव क्र.237 दि.23/09/2025 पारीत केला आहे.

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारुप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाचे कलम 26(1) अन्वये, नागरिकांकडून सूचना / हरकती मागविणेसाठी प्रसिद्ध करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरीकांच्या अवलोकनार्थ, खाली नमुद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

1) आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका
   स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, स्टेशन रोड, भाईंदर (पश्चिम), जिल्हा ठाणे-401101
2) सहायक नगररचना संचालक, मिरा भाईंदर महानगरपालिका
   स्वामी विवेकानंद भवन, आर.बी.के. शाळेच्या बाजूला, कनकिया, मीरा रोड (पूर्व), जिल्हा ठाणे-401107

उक्त प्रारुप विकास योजनेचे नकाशे व तपशीलाच्या प्रती योग्य शुल्क आकारुन नागरीकांना नगररचना अधिकारी तथा सहायक संचालक नगररचना, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे कार्यालयात उपलब्ध होऊ शकतील.

उक्त प्रारुप विकास योजनेतील तरतुदीसंबंधी नागरीकांच्या काही सुचना / हरकती असतील तर त्यांनी सदरची सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत प्रशासक तथा आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, स्टेशन रोड, भाईंदर (पश्चिम), जिल्हा ठाणे-401101 यांचेकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सुचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून 30 दिवसांच्या आत मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे प्राप्त झालेल्या सूचना / हरकती विचारात घेतल्या जातील.

ठिकाण :- मिरा भाईंदर

दिनांक :- २४/०९/२०२५

**राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**